# -: वाहतुक नियंत्रण अधिसूचना :-

क. पोउपआ/मुख्या./वाहतूक/श्रीगणेश आरास/अधिसूचना/ ३७६ /२०२४. नाशिक दि. १० /०९/२०२४

---

**विषय:-** श्री गणेशोत्सव-२०२४ निमत्ताने शहरातील **बी.डी.भालेकर मैदान परिसरातील** गणपती आरास /देखावे पाहण्याकरीता वाहतुक मार्गात बदल करण्यासाठी अधिसुचना निर्गमीत होणे बाबत.

---ooo---

नाशिक शहरात सार्वत्रिक श्री.गणेश उत्सवाचे कालावधीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ दरम्यान सायंकाळचे वेळी शहरातील गणपती आरास पाहण्यासाठी **बी.डी.भालेकर परिसरामध्ये** गणेशभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने वाहतुकीची कोंडी होवु नये म्हणुन आम जनतेच्या सोईसाठी **मी चंद्रकांत खांडवी, पोलीस उप आयुक्त,(मुख्यालय/वाहतूक), नाशिक शहर** महाराष्ट्र शासन गृह विभाग एम.व्ही.ए.-११६/सीआर/३७/टीआर दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन वाहतूक नियोजनासाठी खालील मार्गावर निर्बंध आणणेसाठी अधिसुचना निर्गमित करीत आहे.

खालील नमुद मार्गावर **दिनांक ११/०९/२०२४ ते दिनांक १६/०९/२०२४** पावेतो **सायंकाळी १८.०० ते २४.००** वाजे पावेतो दररोज ठरवुन दिलेल्या वेळेनुसार **सर्व प्रकारच्या वाहनांना 'प्रवेश बंद'** करण्यात येत असुन सदरचे अ.नं. ०१ ते ११ हे मार्ग **''वाहनविरहीत''** करण्यात येत आहे.

**-: सांयकाळी १८.०० ते २४.०० पावेतो सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीसाठी 'प्रवेश बंद' करावयाचे मार्ग :-**

**(वाहनविहीत मार्ग)**

| | |
|---|---|
| १ | अण्णाभाऊ साठे पुतळा (किटकॅट) चौफुली कडुन कालिदास कला मंदिर मार्गे सुमंगल कपडयाचे दुकान शालीमार चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सर्वप्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. |
| २ | सि.बी.एस. बाजुकडुन गायकावाड क्लास, कान्हेरेवाडी मार्गे, अण्णाभाऊ साठे पुतळा (किटकॅट), सुमंगल कपडयाचे दुकान व सुमंगल कपडयाचे दुकानाकडुन कालिदास मार्गे व किटकॅट बाजुकडुन सिबीएस बाजुकडे ये-जा करणारी वाहतूक दोन्ही बाजुन सर्व वाहनांसाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. |
| ३ | सारडा सर्कल येथून - खडकाळी सिग्नल ते शालीमारमार्गे-सी.बी.एस.कडे ये-जा करणा-या सर्वप्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. |
| ४ | खडकाळी सिग्नल येथुन दिपसन्स कॉर्नर - नेहरू गार्डनकडुन गा.मा.पुतळामार्गे - मेनरोड व बादशाही कॉर्नर कडे जाणा-या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. |
| ५ | त्रंबक पोलीस चौकी ते बादशाही कॉर्नर पावेतो ये-जा करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| ६ | गाडगे महाराज पुतळा - धुमाळ पॉईट - ते मंगेश मिठाई कॉर्नर पावेतो सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| ७ | सी.बी.एस. सिग्नलपासुन - शालीमारकडे व नेहरू गार्डनकडे ये-जा करणा-या सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| ८ | मेहेर सिग्नलकडुन सांगली बॅक सिग्नल - धुमाळ पाईन्ट - दहीपुलाकडे ये-जा करणा-या सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| ९ | प्रतिक लॉजकडुन नेपाळी कॉर्नरकडे जाणा-या सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| १० | अशोक स्तंभाकडुन रविवार कारंजा - मालेगाव स्टॅण्डकडे जाणाऱ्या-येणाऱ्या सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| ११ | रविवार कारंजाकडुन सांगलीबॅक सिग्नल मार्गे शालीमार कडे - येणा-या वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |

**वरील प्रवेश बंद मार्गावरील वाहने ही खालील नमुद 'पर्यायी मार्गाने' ये- जा करतील.**

| | |
|---|---|
| १ | खडकाळी सिग्नल - किटकॅट कॉर्नर - मोडक सिग्नल -सिबीएस सिग्नल -मेहेर सिग्नल-अशोकस्तंभ - रामवाडी मार्गे - मालेगांव स्टॅण्ड येथुन इतरत्र जातील. *किंवा* खडकाळी सिग्नल - किटकॅट कॉर्नर - मोडक सिग्नल-सी.बी.एस.सिग्नल - मेहेर सिग्नल - अशोकस्तंभ - रामवाडी - मखमलाबाद नाका - पेठनाका - दिंडोरी नाका मार्गे इतरत्र जातील. |

| | |
|---|---|
| २ | सारडा सर्कल येथुन खडकाळी सिग्नल कडे जाणारी वाहने ही- गडकरी सिग्नल- मोडक सिग्नल- सी.बी.एस. सिग्नल-मेहेर सिग्नल-अशोकस्तंभ-रामवाडी - मखमलाबाद नाका मार्गे - इतरत्र जातील. |
| ३ | मालेगाव स्टॅण्ड पावेतो येणारी वाहने मखमलाबादनाका- रामवाडी मार्गे- जुना गंगापूर नाका सिग्नल-येथुन इतरत्र जातील.<br><br>किंवा<br>गर्दीचे ठिकाणे सोडुन इतर तत्सम पर्यायी मार्गाचा वापर करतील. |

वरिल निर्बंध हे श्री.गणोशोत्सव आरास निमीत्ताने दि.११/०९/२०२४ ते दि.१६/०९/२०२४ पावेतो दररोज सांयकाळी १८.०० ते २४.०० वाजे पर्यंत/ गणपती आरास बंद होई पावेतो अमंलात राहतील.

**वरील सर्व प्रकारचे निर्बथ हे पोलीस सेवेतील वाहने, रूग्णवाहिका व अग्निशमन दलाची वाहने व या परिसरात राहणा-या नागरिकांची वाहने यांना लागु राहणार नाही.**

तरी नाशिक पोलीस आयुक्तालयातील सर्व नागरिकांनी याबाबत नोंद घ्यावी. सदरील अधिसूचनेचे उल्लंघन करणा-यांवर मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ११९/१७७, १२२/१७७, प्रमाणे व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम १३१ (चार) (पाच) तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल यांची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

सदरची अधिसूचना ही माझ्या सही व शिक्यानिशी दिनांक १० / ०९/२०२४ रोजी निर्गमित करित आहे.

स्थळ :- नाशिक शहर
दिनांक :- १० /०९ /२०२४

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) पोलीस नाशिक शहर

(चंद्रकांत खांडवी)
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय/वाहतूक)
नाशिक शहर

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकिय कारागृह मुद्रणालय, येरवडा पुणे-०६.
२/- आपणांस विनंती करणेत येते कि, सदरची अधिसूचनेची प्रसिध्दी पुढील राजपत्रात करावी.

**प्रत सस्नेह अग्रेषित :-** १) आयुक्त, म.न.पा.नाशिक.
२) जिल्हाधिकारी, नाशिक.

**प्रत :-** १) प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक
२) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नाशिक. वृत्तपत्रामधुन प्रसिध्दीकरीता
३) डेपो मॅनेजर, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, नाशिक
४) व्यवस्थापक, सिटी लिंक बस डेपो, मनपा नाशिक

**प्रत :-** सर्व पोलीस उप आयुक्त, नाशिक शहर.
सर्व सहाय्यक आयुक्त, नाशिक शहर.
सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/शाखा, पोलीस आयुक्तालय नाशिक शहर.